# ॲलोपेशिया-चाई-आणि होमिओपॅथी उपचार



## होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम

सुंदर आणि निरोगी केस हे सौंदर्याचे प्रतीक आहे, परंतु केस गळू लागल्यावर या सौंदर्याला गालबोट लागते. प्रत्येकाचे दररोज केस गळतात. दिवसाला १०० केस गळणे हे सर्वसाधारण आहे, परंतु जर कुटुंबामध्ये अकाली टक्कलपणा असणे, माथ्यावरील केस पातळ होऊन विरळ होत जात असतील तर लवकरच योग्य ते उपचार घेण्याची गरज असते. केस हे त्वचेशीच निगडित असतात.

केसाचा उगम त्वचेच्या उपस्तराखाली असलेल्या फुगवट्यापासून होतो. जो त्वचेच्या वरच्या भागात येतो. नवीन केसपेशी जसजशा तयार होतात तसतशा त्या वरच्या भागात ढकलल्या जातात. जसजशा पेशी वरती ढकलल्या जातात, त्या निर्जीव आणि घट्ट होतात. यालाच आपण आपल्या निदर्शनास येणारा केस म्हणतो. हा केस बाहेरच्या बाजूला रंगहीन पातळ पेशींचा, तर आतल्या बाजूने कॅरॅटिनसारख्या टणक प्रथिनांचा बनलेला असतो. ज्यामुळे केसाला घनदाटपणा येतो. केसांचा कलर हा या दोन आवरणांमध्ये स्रवणाऱ्या रंगद्रव्यांवर अवलंबून असतो. केसांच्या मुळाशी असलेल्या सबेशिअस ग्रंथींमुळे केसांना वंगण मिळते. आजारपणामुळे किंवा ताणतणावामुळे हे रंगद्रव्य कमी पडते आणि केस पांढरे पडतात.

केस ८५ टक्के केरॅटिन, ७५ टक्के पाणी, ३ टक्के स्निग्ध पदार्थ, २ टक्के पिगमेंट, २ टक्के नत्र जसे की, ॲल्युमिनिअम, क्रोमिअम, कॅल्शिअम, फॉस्फरस, झिंक यांनी बनलेला असतो. केसाच्या जाडीनुसार केसाचे वर्गीकरण १. व्हॅलस २. टर्मिनल ३. लॅन्युगो या प्रकारांत केले आहे. व्हॅलस - केस हे पातळ, कमी रंगद्रव्य असलेले असतात. जे शरीरातील संपूर्ण भागात दिसतात. टर्मिनल - केस हे डार्क, घनदाट व लांबसडक असतात. हे केस डोक्यावर, दाढीच्या ठिकाणी, काखेत आणि जांघेत असतात. लॅन्युगो - हे केस लहान बाळांमध्ये जन्मल्यानंतर दिसतात. जे सातव्या ते नवव्या महिन्यांत पडून जातात.

केसाचे आवर्तन हे सतत कार्यक्षम स्थितीतून अकार्यक्षम स्थितीत होत राहते. या आवर्तनाची सुरुवात ॲनाजेन या स्थितीत होते. ॲनाजेन फेजचा कालावधी ३ ते १० वर्षांचा असतो. डोक्यावरील ८० ते ९५ टक्के केस या स्टेजमध्ये असतात.

**कॅटाजन फेस** - ॲनाजेन फेजनंतर केसांची मुळे स्वतःहून स्वतःच्या मुळांवर घात करतात. डोक्यावरील एकच टक्का केस या फेजमध्ये असतात आणि याचा कालावधी दोन आठवड्यांचा असतो. या फेजमध्ये केस पातळ होतात आणि केसातील रंगद्रव्यही कमी होते.

**टिलोजेन फेज** - ही फेज स्थिर असते. यामध्ये केस परिपक्व होतो आणि केसाच्या खोडापासून वेगळा होतो. जवळजवळ १० टक्के केस या फेजमध्ये असतात. त्यामुळेच दररोज १०० एक केस गळत राहतात. या फेजचा कालावधी १ ते ३ महिन्यांचा असतो. यानंतर पुन्हा नवीन केसांची निर्मिती होते. केसांची वाढ आणि प्रत ही स्त्रियांमध्ये स्रवणाऱ्या इस्टोजेन व पुरुषांमध्ये स्रवणाऱ्या टेस्टोस्टेरॉन आणि थायरॉइड संप्रेरकांवर अवलंबून असते.

**केस गळण्याचे प्रकार** : पुरुषांमधील टक्कलपणा - पुरुषांच्या माथ्यावरील केस हळूहळू कमी होऊ लागतात. घरामध्ये वडील, आजोबांना अशाप्रकारचा टक्कलपणा म्हणजेच आनुवंशिकता हे याचे कारण आहे.

**स्त्रियांमधील टक्कलपणा** - हा स्त्रियांमध्ये इस्ट्रोजन हार्मोनच्या कमतरतेमुळे ३० ते ४० वयामध्ये आढळणारा केसगळतीचा प्रकार आहे.

**टिलोजन इफ्लूवियम** - यामध्ये मोठ्या प्रमाणात केस टिलोजन फेजमध्ये म्हणजे झडतीच्या स्थितीत जातात. नवनिर्मितीपेक्षा केस जास्त प्रमाणात गळाल्यामुळे असा आजार उद्‌भवतो. अशी स्थिती फ्ल्यूनंतर, मानसिक धक्क्यामुळे किंवा गरदोरपणानंतर उद्‌भवते.

किमोथेरॅपॅटिक हेअर लॉस - कॅन्सरसाठी घेण्यात येणाऱ्या औषधांमुळे केसपेशींचे विभाजन होणे थांबते आणि त्यामुळे केस गळतात.

**ॲलोपेशिआ एरिआटा** - म्हणजेच चाई पडणे. हा प्रकार स्वायत्त प्रतिकार संस्थेच्या बिघाडामुळे शरीराच्या प्रतिकारपेशी स्वतःच्याच केसांच्या मुळांवर आघात करतात. त्यामुळे डोक्यावर केसरहित चट्टा किंवा शरीरावरील इतर कुठल्याही भागात दिसून येतो. अशी चाई पुन्हा पुन्हा उद्‌भवू शकेल.

**ट्रायकोटिलोमॅनिआ** - या मानसिक आजारात रुग्ण स्वतःच्या डोक्यावरील, दाढीतील, भुवयांवरील केस उपटत राहतो.

स्कार्टिंग ॲलोपेशिआ - भाजल्यानंतर, एक्स-रेमुळे, त्वचेच्या कॅन्सरमुळे किंवा अतिशय दुखापतीनंतर अशी केसगळती उद्‌भवते.

**कारणे** : १. आनुवंशिकता आणि जनुकीय कारण, २. मानसिक ताणतणावामुळे संप्रेरकांमध्ये बिघाड होऊन केस गळू लागतात. शारीरिक ताणतणाव - शस्त्रक्रियेनंतर किंवा कुठल्याही आजारानंतर किंवा उच्च तापामुळे निर्माण होणारा शारीरिक तणाव यामुळे केस गळतात. ३. किमोथेरपी ४. असंतुलित आहार - जास्त करून प्रथिने आणि लोहाची कमतरता यामुळे केस गळू शकतात. ५. थायरॉइड ग्रंथींचे विकार जसे की, हायपोथायरॉइडजम आणि हायपरथायरॉडिजम ६. डोक्याला लहान मुलांमध्ये बुरशीचा प्रादुर्भाव होऊन केस गळतात. ७. केसांसाठी सौंदर्यप्रसाधनांचा जास्त प्रमाणात वापर, जसे की, केस रंगविण्यासाठी वापरण्यात येणारे डाय इत्यादी. ८. शरीरबाह्यंतर्गत घेण्यात येणारे हार्मोन्स, संततीनियमनाच्या गोळ्या, गरोदरपण, रजोनिवृत्ती यामुळेही केस गळतात.

वरील लेखावरून तुमच्या लक्षात आले असेल की, केस गळण्याचे कारण हे शरीरांतर्गत होणाऱ्या बिघाडामध्ये आहे. त्यामुळे केस गळण्यावर बाह्य उपचार करणे अतिशय चुकीचे आहे. अशा चुकीच्या औषधांच्या दडपशाहीमुळे केस गळणे हा आजार बाजूलाच राहून शरीरांतर्गत महत्त्वाच्या अवयवांमध्ये बिघाड व्हायला सुरुवात होते आणि शरीर विविध आजारांना बळी पडू लागते.

**केस** - ही एका मुंबईतील प्रख्यात डॉक्टर कुटुंबातील १६ वर्षांच्या मुलाची केस आहे. ॲलेपेशिया म्हणजे डोक्यावरील भरगच्च केसांचा नाण्याच्या आकाराचे छोटे-मोठे केस गळण्याचा आजार. त्याला काहीजण 'चाई' या नावाने संबोधतात. असा हा केसांचा विक्षिप्त आजार ज्याच्यामध्ये मुळापासून केस नष्ट होतात आणि नाण्याच्या आकाराचे टक्कल पडते. पुढे पुढे या छोट्याशा टक्कलेचा स्पॉट आकाराने मोठा होत जाऊन निम्मा अर्धा डोक्यावरील केसांचा भाग नष्ट करून वेडेवाकडे टक्कल तयार होते.

या आजारावर या मुलाने असंख्य तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचार घेतले. पण कोणीही त्याच्या चाईला ठीक करू शकले नाही. त्या अर्धवट केसगळतीने तो मुलगा खूप निराश आणि हताश झाला होता.

**विशेष माहिती** : १. खूप जास्त प्रमाणात जेवण करणे. २. खाण्यात तिखट, आंबट, गोडाची, आइस्क्रीम, नॉनव्हेजची आवड. ३. गोडामुळे दात सळसळणे. ४. जास्त प्रमाणात सतत तहान लागणे. ५. पोटात सतत घाणेरडा वास येणारे गॅसेस होणे. ६. झोपेत दचकणे आणि भुतांची स्वप्नं पडणे. ७. शरीरावर खूप प्रमाणात, पण पटकन घाम घेणे. ८. थंड प्रकृती.

**स्वभाव : त्याचा स्वभाव कसा आहे?**

तो एकटाच आम्हाला मुलगा असल्याकारणाने लहानपणापासूनच खूप लाडावलेला आहे. त्यामुळे कुठल्याही गोष्टीवर तो पटकन चिडतो. त्याला चिडवलेले सहन होत नाही.

**त्याला कशाची आवड आहे?**

त्याला नृत्याची, गाण्याची, कॉम्प्युटर गेम खेळण्याची आवड आहे. जी गोष्ट तो करतो त्याचाच त्याला एकसारखा नाद लागतो आणि तो त्यात गुंगून जातो.

**त्याला कशाचा ताणतणाव जाणवतो?**

तो अभ्यासाचा खूप ताण घेतो. तसेच कोणी त्याच्याकडे दुर्लक्ष केले, त्याला एकटं सोडून गेलं तरी त्याचा त्याला त्रास होतो. परीक्षेच्या आधी त्याला सतत काळजी वाटत राहते. परीक्षेत कमी मार्क्स मिळाले तर तेच सतत त्याच्या डोक्यात राहते. मग त्याला खूप समजावून सांगितल्यावर बरे वाटते.

**त्याला भीती कशाची वाटते?**

**त्याला अंधाराची, सापांची, किड्यांची भीती वाटते.**

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व** : १. दंग होऊन जाण्याचा स्वभाव. २. भित्रा स्वभाव ३. खूप लाडावलेला ४. लठ्ठपणा ५. दुसऱ्यांकडून उपेक्षित झाल्याची भावना. ६. चुकांचा पश्चात्ताप होण्याची वृत्ती. ७. सांत्वन केल्यावर बरे वाटते. ८. खाण्यात मसालेदार, मांसाहार, गोडाची व आइस्क्रीमची आवड. ९. जास्त प्रमाणात सतत तहान लागणे. १०. सतत गॅसेसचा त्रास होणे. ११. सहज संपूर्ण शरीरावर गरम घाम येणे. १२. झोपेत दचकणे व भुतांची स्वप्नं पडणे. १३. डोक्यावरील केस गळणे. १४. थंड प्रकृती.

**प्रतिसाद** : वरील लक्षणांचा विचार करून, त्याच्या मानसिक स्थितीचा अभ्यास करून त्याला मी एक होमिओपॅथिक औषध सुरू केले आणि महिनाभराने परत भेटीसाठी बोलावले.

परतच्या भेटीत त्याच्या डोक्यावर चाई असलेल्या भागात बरेचसे केस उगवलेले दिसले. पुन्हा दोन महिन्यांनी फेरतपासणीसाठी बोलावले असता वाढलेल्या केसांमुळे त्याचा चेहरा खूपच खुलून आला होता आणि त्याच्या डोक्यावरील चाई पूर्ण नष्ट झाली होती. होमिओपॅथीने केसाच्या विद्रूप आजारातून त्याला रोगमुक्त केले होते.


आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
तपोवन मंदिर रोड, मोर मॉलच्या समोर,
पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९


# कैद्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन



**। पुणे : प्रतिनिधी**

शिक्षा भोगल्यानंतर कैद्यांना समाजात वावरताना अनेक अडचणी येतात. या कैद्यांचे पुनर्वसन व्हावे या उद्देशाने त्यांना कारागृहातच विविध कामांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यामुळे शिक्षा संपल्यानंतर ते स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात, असे अपर पोलीस महासंचालक उपाध्याय यांनी सांगितले.

कारागृहातील पुरुष आणि महिला कैद्यांनी तयार केलेल्या अशा विविध वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन अभिनेते प्रशांत दामले आणि अपर पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांच्या हस्ते झाले. यावेळी कारागृह उपमहानिरीक्षक शहाजी सोळुंके, स्वाती साठे, कारागृह अधीक्षक यू. टी. पवार, वरिष्ठ तुरुंग अधिकारी तथा कारखाना व्यवस्थापक प्रदीप जगताप आदी उपस्थित होते.

भूषणकुमार म्हणाले, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांना हातमाग, यंत्रमाग, सुतारकाम, शिवणकाम, चर्मकला, बेकरी, लोहारकाम, धोबीकाम, कागद कारखाना अशा विविध उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे कैद्यांना आर्थिक मोबदला तर मिळतोच, परंतु शिक्षा संपल्यानंतरही त्यांना चांगल्या पद्धतीने जीवन जगायला मदत होते. कलाकुसरीने तयार केलेल्या शोभेच्या वस्तू, पेंटिंग्ज, हातमागावरील कपडे यातून कारागृह प्रशासनाला कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# फटाक्यांत शिसे, गंधक आणि पाऱ्याचे प्रमाण जास्त

**। पुणे : प्रतिनिधी**

दिवाळीसाठी बाजारात आलेल्या फटाक्यांत आरोग्याला हानिकारक असलेल्या रसायनांचा प्रमाणापेक्षा अधिक वापर असल्याचे 'आवाज फाउंडेशन' या बिगर-सरकारी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून उघड झाले आहे. सर्व फटाक्यांत शिसे, गंधक आणि पाऱ्याचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त आहे. म्हणून तातडीने त्यांची विक्री थांबवावी, अशी विनंती संस्थेच्या प्रमुख सुमैरा अब्दुलाली यांनी केंद्रीय वन आणि पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांच्याकडे केली आहे.

## विक्री थांबवावी; 'आवाज फाउंडेशन'ची मागणी



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि आवाज फाउंडेशन यांनी दिवाळीनिमित्त बाजारात आलेल्या फटाक्यांची पाहणी केली. त्यांच्या अहवालानुसार सर्वच फटाक्यांत शिसे, गंधक आणि पारा या धोकादायक रसायनांचा अतिवापर आहे. जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या १० अतिधोकादायक रसायनांच्या यादीत शिसे आणि पारा यांचा समावेश आहे. याबाबत अब्दुलाली यांनी केंद्रीय वन आणि पर्यावरणमंत्री जावडेकर यांना पत्राद्वारे माहिती दिली आहे. लोकांच्या गर्दीत तसेच पाण्याजवळ या फटाक्यांचा वापर करणे आरोग्यासाठी अपायकारक आहे. गंधकाचा पाण्याशी संबंध आल्यास सल्फ्युरिक ॲसिड तयार होते. समुद्राच्या पाण्यात मिसळलेले शिसे हे मासे आणि मत्साहार करणाऱ्यांसाठी अपायकारक आहे. म्हणूनच ही घातक रसायने असलेले फटाके बाजारातून मागे घ्यावेत, अशी विनंती अब्दुलाली यांनी पत्रात केली आहे. या फटाक्यांची निर्मिती तमिळनाडू, राजस्थान आणि जळगाव येथे झाली आहे.

## आपलं व्यासपीठ

### फडणवीस सरकारची वर्षात महागाई

महाराष्ट्रात प्रथमच सत्तेवर आलेले भारतीय जनता पक्ष व त्या पक्षाचे श्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री पदावर स्थानापन्न झाल्यानंतर आपल्या अर्थसंकल्पात मेट्रोसाठी १७४ कोटी रुपये देण्याची घोषणा केली. पुणे-मुंबई सह महाराष्ट्रातील सर्वच शहरांतील एस.टी. स्थानकांचे आधुनिकीकरण करणे, पाच प्रमुख शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी आर्थिक मोठी तरतूद करणे, एलबीटी १५ ऑगस्टपासून बंद करणे, अशा योजनांची घोषणाबाजी केली खरी तर दुसऱ्या बाजूने राज्याच्या तिजोरीत आर्थिक पैशाचा खडखडाट असल्याचेही जाहीर केले. महाराष्ट्रावर तीन लाख चारशे चव्वेचाळीस कोटींचे कर्ज असून त्यात दरवर्षी व्याजापोटी तेवीस हजार कोटी रुपयांची भर पडत आहे. अशा सर्व प्रकारे कर्जाचा मोठा डोंगर असल्याने घोषणा केलेल्या योजना कशा राबविणार त्याचप्रमाणे कुपोषण होऊ नये, प्रत्येक गावात पुरेसा पाणी पुरवठा करणे, चांगले रस्ते आदी योजना राबविण्याच्या घोषणा केल्या होत्या. सत्ता हातात येवून आता एकवर्षे पुर्ण झाले तरी या घोषणा कागदावरच धुळखात पडल्या. कांदा, विविध डाळी, विविध खाद्यतेलांची दरवाढ झाली असून महागाई दुप्पट झाली. भ्रष्टाचार सुरुच आहे. या सर्वांना अटकाव झालाच नाही याकडे दुर्लक्ष करुन सध्या फडणवीस हे मित्रपक्षांबरोबर वादावादीची जुगलबंदी करीत आहेत. त्यामुळे जनता समाधानी नाही. अशाप्रकारे फडणवीस सरकारची वर्षपुर्ती झाली.

-कृष्णा दयाराम नाईक
बालाजीनगर धनकवडी

**टीप** : आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

# पाच हजार एलइडी बल्बचे वितरण

**। पुणे** : शहरात गेल्या दोन दिवसांत ५ हजार २८ एलइडी बल्बचे वितरण करण्यात आले. सद्यस्थितीत एनर्जी एफिशियंसी सर्व्हिसेस लिमिटेडचे (ईईएसएल) पाच ठिकाणी बल्ब वितरण केंद्र सुरू असून सोमवार (१ नोव्हेंबर) पासून शिवाजीनगर विभाग व नगर रोड विभागात ही वितरण केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

महावितरणच्या रास्तापेठ कार्यालयात तसेच रविवार पेठ, सोमवार पेठ, कसबा पेठ, वानवडी येथील शाखा कार्यालयांच्या ठिकाणी ईईएसएलने बल्ब वितरण केंद्र सुरू केलेले आहे. यात २९ ऑक्टोबरला रास्तापेठ कार्यालयातील ९७४ तर ३० ऑक्टोबरला ५ वितरण केंद्रातून ४ हजार ५४ एलइडी बल्बचे वितरण करण्यात आले.

प्रत्येक ग्राहकास प्रत्येकी १०० रुपयांचा एक बल्ब असे एकूण १० बल्ब मिळतील. यात हप्त्यांची योजना असून, वीजग्राहकांना १० पैकी जास्तीत जास्त ४ एलइडी बल्ब हे प्रत्येकी १० रुपये ॲडव्हॉन्स भरून खरेदी करता येईल व उर्वरित प्रत्येकी ९५ रुपये १० हप्त्यांत देता येईल. बाजारपेठेत ७ वॅट एलइडी बल्बची किंमत सुमारे ४०० रुपये आहे. परंतु या योजनेतून केवळ १०० रुपयांत घरगुती ग्राहकांना एलइडी बल्ब उपलब्ध होणार आहे.

बल्बची तीन वर्षांची वारंटी असून त्या कालावधीत बल्ब खराब झाल्यास खरेदीची पावती किंवा वीजबील दाखवून नादुरुस्त बल्ब बदलून मिळणार आहे. फक्त हप्त्यांनी बल्बची खरेदी केलेल्या वीजग्राहकांना संबंधीत मोबाईल एसएमएसद्वारे बल्बची संख्या व रकमेची माहिती ईईएसएलकडून दिली जाणार आहे व उर्वरित रक्कम १० मासिक वीजबिलातून कपात केली जाणार आहे.











